# क्लब ऑफिसर म्हणून देवचंदच्या चार विद्यार्थ्यांची निवड



निपाणी (प्रतिनिधी) : देवचंद कॉलेजच्या संगणक शास्त्र विभागातील चार विद्यार्थ्यांची सुप्रसिद्ध क्विक फाउंडेशन तर्फे क्लब ऑफिसर म्हणून निवड करण्यात आली. क्लब ऑफिसर म्हणून निवड झालेलले ०४ विद्यार्थी व २६ सायबर वॉरियर्स यांना निडसोशी येथे नुकत्याच पार पडलेल्या कार्यक्रमात गौरविण्यात आले.

हर्षवर्धन जबडे यांची प्रेसिडेंट म्हणून, समृद्धी भराडे हीची सेक्रेटरी, अलोक कांबळे यांची मीडिया डायरेक्टर, व अर्थव माने यांची कम्युनिटी डायरेक्टर व या उपक्रमासाठी प्रा. प्रशांत कुंभार यांची समन्वयक म्हणून निवड करण्यात आली आहे. आजच्या डिजिटल युगात इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. याबरोबरचं ऑनलाईन जीवनात सायबर अपराध्यांच्याही संख्येत वाढ होत आहे. आणि त्यासाठीच देवचंद कॉलेजच्या चार विद्यार्थ्यांची क्लब ऑफिसर म्हणून निवड करण्यात आली. या चार ऑफिसरच्या नेतृत्वात २६ सायबर वॉरियर्स पुढील दोन महिने कोलेजच्या परिसरातील शाळा, महाविद्यालये तसेच समाजातील विविध घटकांना सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करणार आहेत.

या उपक्रमाचे हे दुसरे वर्ष असून, मागील दोन्ही वर्षात या उपक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी विविध पुरस्कार पटकावले आहेत. मागील वर्षी केलेल्या कामाचे सर्वत्र कौतुक होत आहे. क्विक हिल फाउंडेशन पुणे आणि देवचंद कॉलेज या दोन संस्थांमध्ये सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा : कमवा व शिका या उपक्रमांतर्गत नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या उपक्रमास जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. आशिषभाई शाह, आणि उपाध्यक्षा डॉ. सौ. तृप्तीभाभी शाह यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले. तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रो. डॉ. जी. डी. इंगळे व उपप्राचार्य प्रो. डॉ. पी. पी. शाह यांचे मार्गदर्शन मिळाले.